अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# मन आणि पर्यावरण संक्रमणाचा वेध संक्रांत

सूर्याचा मकर राशीत होणारा प्रवेश आणि त्यानिमित्ताने एकूणच सृष्टीमध्ये घडणाऱ्या संक्रमणाचे स्वागत करण्याकरिता मकर संक्रांतीचा उत्सव साजरा होतो. भारतीय संस्कृतीमध्ये प्रकृती आणि व्यक्ती, सृष्टी आणि समष्टी याचा नेहमीच सुरेख संगम साधल्याचे आपल्याला पहायला मिळते. कालचक्रानुसार सृष्टीमध्ये घडत जाणारे बदल हे मनुष्याच्या मनोरचनेशी संबंधित असतात. त्याचा सर्वप्रथम शोध भारताच्याच ऋषीमुनींनी हजारो वर्षांपूर्वी लावला हे नाकारता येणार नाही. म्हणूनच सूर्याचा मकर राशीत होणारा प्रवेश ही केवळ एक भौगोलिक परिवर्तनाची घटना राहात नाही, तर ती मनाच्या आंतरिक बदलाचीही नोंद घेणारी असते. 'तिळगुळ घ्या गोड गोड बोला' असे म्हणताना तिळाइतक्या लहान वाटणाऱ्या गोष्टीमध्येदेखील सृष्टीच्या आणि समाजाच्या बदलाचे सार दडलेले आहे हे थोडेसे बारकाईने अभ्यास केल्यावर लक्षात येते. हेमंत ऋतूचे शेवटचे पर्व वातावरणातला जाणवणारा गारवा मनुष्याच्या शरीरावर परिणाम करतो. तर या सूर्याच्या मकर प्रवेशामुळे हळूहळू दिवस मोठा होत जातो. हा बदल तितक्याच सहजतेने स्वीकारता यावा या बदलांबरोबर स्वत:मधला आत्मविश्वास टिकवून ठेवता यावा, अशी एक रचना त्यानिमित्ताने लाभली गेल्याचे दिसून येते. पर्यावरणातले हे संक्रमण म्हणजेच बदल मनुष्याच्या लक्षात यावेत आणि त्या बदलानुसार त्याने स्वत:च्याही वागण्याबोलण्यात, आचारविचारात आणि व्यवहारात बदल करावेत अशी त्यामागची अपेक्षा असते. मुळातच मनुष्य हा संवेदनशील प्राणी मानला जातो. सृष्टीच्या या बदलाचे तितकेच संवेदनशीलतेने निरीक्षण आणि अनुकरण करण्याची किमया साधण्याचा प्रयत्न यानिमित्ताने होत असतो. व्यक्ती आणि प्रकृती यातल्या संक्रमणाचे संवेदनशील स्वरुप म्हणूनच या मकर संक्रांतीचा उल्लेख करावा लागेल. दरवर्षी सृष्टीत हा बदल घडत असतो. कालचक्र चालू राहते. पण मनुष्य या परिवर्तनाची कशी दखल घेतो यावर बरेच काही अवलंबून असते. दरवर्षी संक्रांत येते. एकमेकांना तिळगुळ दिले जातात. गोड बोलण्याचे आवाहन करून शुभेच्छांचे आदान-प्रदान होते. मकर संक्रांत ते रथसप्तमीपर्यंत अनेक ठिकाणी सूर्योपासना केली जाते. मग अगदी नवीन लग्न झालेल्या नवनवतीला हलव्यांचे दागिने घालण्यापासून ते घरातल्या नव्याने आलेल्या लहानग्या बाळाला 'बोर न्हाण' घालण्यापर्यंतचे उपक्रम साजरे होतात. रथसप्तमीपर्यंत हा मकर संक्रांतीचा उत्सव हळदीकुंकवाच्या कार्यक्रमांनीदेखील एकाअर्थी गाजत असतो. असा हा सृष्टीचा आणि समष्टीचाही समन्वय साधणारा संक्रांतीचा उत्सव सामाजिक प्रेरणेचा एक स्रोत मानायला हवा.

## सृष्टी आणि समष्टिचा समन्वय

आज मात्र या संक्रांती पर्वाचा विचार करताना सामाजिक परिस्थितीचे निराशाजनक चित्र डोळ्यासमोर येते वाढलेल्या महागाईने लोक हैराण झालेली आहेत. तीळ आणि गूळ हेदेखील आपल्याला परवडणार नाहीत अशी भीती या महागाईने निर्माण केली आहे. तर दुसरीकडे राजकारणामध्ये मोठे परिवर्तन घडून येत आहे. राजकीय हालचालींमुळे परिवर्तनाची एक वेगळी चाहुल जाणवत आहे. खरे सांगायचे तर सामाजिक आणि राजकीय पातळीवर एक संक्रमणावस्था निर्माण झाली आहे. तिची समाजातूनही बऱ्यापैकी दखल घेतली जात आहे. हा सगळा बदल म्हणजे समाजाला उत्साह देणारा आणि काहीतरी वेगळे घडेल अशा प्रकारची आशा निर्माण करणारा ठरू शकेल. कालचक्र कोणालाही उलटे फिरवता येत नाही. पण कालचक्राबरोबर तिच्यासाठी नवी पाने निश्चितपणे लिहिता येऊ शकतात. अशा संक्रमणांसाठीसुध्दा समाजामध्ये आत्मविश्वास आवश्यक असतो. तो निर्माण करण्याचे काम या वर्षीच्या संक्रांतीतून व्हावे अशीही अपेक्षा बाळगायला हरकत नाही. ज्यावेळेला आपण सृष्टी आणि समष्टी असा मुद्दा मांडतो त्यावेळेला व्यक्तीच्या खाजगी जीवनापासून ते समाजातल्या अनेक विषयांपर्यंत त्याचा संबंध येतो आणि तिळातला स्नेह आणि गुळातला गोडवा यांच्या मिश्रणामधून पोषक असा शारीरिक आहार उपलब्ध होतो. ज्या हेमंत आणि शिशीर ऋतूमध्ये आरोग्यासाठी चांगला मानला जातो. त्याचवेळी तीळ आणि गुळाचे होणारे एकत्रीकरण हा सामाजिक एकतेचाही संदेश देणारा ठरतो. मकर संक्रांतीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे हा उत्सव सूर्याशी थेट संबंध सांगतो. सूर्य हा प्रकाशाचा दर्शक आहे. तिमिराचा नाश करून उत्साहाची ऊर्जा देतो. तसेच सूर्याचे सृष्टीमध्ये असलेले अनन्यसाधारण महत्त्व हे मनुष्याला कार्यप्रवण करणारे मानले गेले आहे. जवळपास सगळ्या विश्वाचे चलनवलन सूर्याच्या गतीवर अवलंबून असते. आत्मविश्वासाचे दान देण्याचे काम सूर्याकडून प्राप्त करता येते. आणि म्हणूनच या सूर्याच्या साक्षीने संक्रमणाचे हे सत्य सांगण्याचा प्रयत्न भारतीय संस्कृतीने केला असावा.

## खऱ्या सुखासाठी

जी व्यक्ती सूर्याप्रमाणे तेजाचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करते आणि सतत कार्यप्रवण राहण्याची प्रतिज्ञा करते, त्या व्यक्तीला हाच सूर्य खऱ्या अर्थाने कर्मयोग समजावून सांगत असतो. आणि मग अशा व्यक्तीला दारिद्र्य, गरिबी स्पर्श करू शकत नाही, म्हणूनच सूर्याला नमस्कार करताना ।आदित्यस्य नमस्कार कुर्वन्तु मे दिने दिने। जन्मांतर सहस्रेशु दारिद्र्यंनोप जायते। याचा अर्थ सूर्याची आराधना करणाऱ्या व्यक्तीला दारिद्र्य स्पर्श करू शकत नाही अशा प्रकारचा अतिशय महत्त्वपूर्ण संदेश सूर्याच्या या मकर संक्रमणाच्या निमित्ताने मनुष्याला दिला गेला आहे. आता या गोष्टीची मनुष्य किती बारकाईने दखल घेतो हा खरा प्रश्न ठरतो. आजच्या धकाधकीच्या आणि धावपळीच्या जीवनात कोणालाही बारीक विचार करायला वेळ नाही. मग सूर्याचे हे संक्रमण आपल्यासाठी मार्गक्रमण सांगणारे आहे. हे जाणून घेण्याचीही जिज्ञासा शिल्लक राहात नाही. आज ज्या वेगाने मनुष्य सुख आणि पैशाच्या मागे धावतो आहे ते पाहिल्यावर इतक्या छोट्या-छोट्या गोष्टींमधून त्याला खऱ्या अर्थाने खरे सुख मिळू शकते, तेसुध्दा तो ठरवून जगतो आहे. दरवर्षी येणारी संक्रात मनामध्ये नव्या आत्मविश्वासने जागवली पाहिजे. तिळगुळ देताना मनातल्या आणि पर्यावरणातल्या संक्रमणाचा वेध घेण्याची क्षमता वाढवली पाहिजे. या साध्या साध्या गोष्टीही विज्ञान तंत्रज्ञानापुढेसुध्दा किती महत्त्वाच्या आहेत हे त्याचे निरीक्षण केल्यानंतर लक्षात येते. सुखासाठी धावत सुटणाऱ्या मनुष्याने दोन क्षण विश्रांतीसाठी थांबून विचार केला तर या खऱ्या संपत्तीचा वेगळा अनुभवही येऊ शकेल.